IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# देव–दानव जन्माचं शापित कडं भेदून मी आता,जन्माला घालणार आहे माणूस ‘कोण म्हणतं टक्का दिला?: संजय पवार’

Dr. Suresh Deorao Wardhe
Assistant Professor
Dr. Ambedkar Institute of Social work, Manewada, Nagpur. Maharashtra, India.

१८८० ते १९१६ हा अण्णासाहेब किर्लोस्कर आणि गोंविद बल्लाळ देवल या दोन नाटककारांचा कालखंड होय.या कालखंडात स्त्री जीवनातील दु:खाचे, व्यथा- वेदनांचे आणि स्त्रीला दुय्यमत्व देणाऱ्या सनातनी समाजव्यवस्थेचे दर्शन होते. समकालीन समाजव्यवस्थेत स्त्री शिक्षणापासून वंचित होती. ती अंधारात चाचपडत होती. बालविवाहाच्या अनिष्ट  रूढी परंपरेतून स्त्री जीवनाची मोठ्या प्रमाणात परवड होत होती. पुनर्विवाहाच्या अभावातून दु:ख येत होते. जरठ-विवाहातून होणारी स्त्री मनाची घालमेल होत होती.या सर्व स्थितीचे चित्रण अण्णासाहेब किर्लोस्कर आणि गोंविद बल्लाळ देवल त्यांनी नाटकातून/रंगभूमीवरून चित्रित केले.

अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांनी शांकुतल,सौभद्र,रामराज्य वियोग इत्यादी पौराणिक नाटकातून समाजस्थितीचे चित्रण केले आहे. देवलांनी शारदा, झुंजारराव , संशयकल्लोळ, मृच्छकटिक इत्यादीतून स्त्री समस्यांना वाचा फोडली.

राम गणेश गडकरी,समकालीन नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या दोन नाटककारांनी सुद्धा स्त्री दु:खाला वाचा फोडली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी तत्कालीन समाजव्यवस्थेतील प्रेमप्रकरण, जातीयवाद, विधुरविवाह , शिक्षण अशा अनेक समस्यांना हात घातला. आणि त्या समस्या म मराठी रंगभूमीवरून चित्रित केल्या फ वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, प्रेमशोधन, वधुपरीक्षा, सहचारिणी, परिवर्तन, जन्मरहस्य इत्यादी नाट्यकृतीतून तत्कालीन समाजव्यवस्थेतील स्थितीगतीचे दर्शन घडविले.नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांनी मात्र पौराणिक कथा घेऊनच नाटकांची निर्मिती  केली. तत्कालीन समाजातील सर्वसामान्य स्त्री जीवनाचे दर्शन त्यांच्या नाटकांतून होत नाही. त्यांनी म आदर्श स्त्री धर्माचाफविचार आपल्या नाटकातून मांडला. त्यांनी आपल्या नाटकातून चित्रित केलेल्या स्त्री व्यक्तिरेखांमध्ये  विदर्भकन्या रूक्मिणी, द्रौपदी, मेनका, शुक्राचार्याची मुलगी देवयानी, आनंदीबाई, सैरंधी, कैकयी, मंथरा इत्यादी  असामान्य परंतु पौराणिक कथांतून स्त्री व्यक्तिरेखा साकारून उच्च आदर्श स्त्री धर्म त्यांनी मांडला.मनाची पवित्रता ही सुद्धा सामाजिक सुधारणा होय. असं ते मानत होते.

खाडिलकरांच्या स्त्रिया दु:खी आहेत. त्यांची दु:ख त्या प्रतीची आहेत. याविषयी आपले मत नोंदवितांना प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणतात- “खाडिलकरांचे मन वर्तमानाचा विचार नेहमीच रामायण-महाभारतातील अनेक अर्थपूर्ण कथांच्या संदर्भात करित असते.तो खाडिलकर ह्या मनाचा धर्मच आहे.”[१] या विचारधारेतूनच खाडिलकरांनी आपल्या नाटकातून असामान्य स्त्री व्यक्तिरेखांव्दारे आदर्श स्त्रीधर्माचे दर्शन घडविले.खाडिलकरांच्या या उच्च स्त्री आदर्शाचा प्रभाव गडकऱ्यांच्या मनावर होत होता.या प्रभावातूनच राम गणेश गडकरी यांची मनोवृत्ती तयार होत होती.एकदा राम गणेश गडकरी म्हणाले होते की,“ कोल्हटकर व खाडिलकर या दोघांना घेऊन मीही असाच मराठी रंगभूमीवर आलो आहे.”[२] तत्कालीन समाजव्यवस्थेत गडकरी पूर्व नाटककार व गडकरी समकालीन नाटककार आणि स्वतः राम गणेश गडकरी यांनी मराठी रंगभूमीवरून स्त्री जीवनातील दु:खाचे, व्यथा-वेदनाचे दर्शन करून दिलेत नव्हे स्त्री सुधारणांना अनुकूल असे वातावरण निर्मिती सुद्धा केली.“ मराठी नाटकांचा दिडशे वर्षाचा इतिहास विचारात घेतला तर ढोबळमानाने पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक  आणि नंतरच्या काळात कौटुंबिक  आणि साठच्या आसपास प्रायोगिक असे पाच वर्ग गृहित धरता येतील.”[३] म्हणजे पौराणिक नाटकांपासूनचा नाट्यप्रवास हा वेगवेगळ्या टप्प्यानुसार झालेला दिसून येतो. परंतु भाषाच्या बाबतीत गडकऱ्यांच्या पाचअंकी नाटकापर्यंत बदल झालेले आपण पाहिलेत.“१९३३ पर्यंत पाचअंकी बहुप्रवेशी नाटक आणि पल्लेदार, आलंकारिक भाषा आणि रागदारीतील पदे असेच नाटकाचे स्वरूप होते.याभाषिक अतिव्ययाचे अंतिम टोक आपल्याला गडकऱ्यांच्या नाटकात दिसते.”[४] पुढे हे चित्र सुद्धा बदलत गेले.“स्वातंत्र्याच्या आसपास हे चित्र बदलतले. नाट्यसंस्थांच्या उपक्रमात,दिगदर्शकाचा आणि विपूल संहिताचा काळ सुरू होतो.१९५५ नंतर चित्र पुन्हा पालटले.प्रायोगिक नवे नाटक अस्तित्वात येत होते. याच काळात एक महत्त्वाची घटना घडली.”[५] आणि पुढे येणाऱ्या संहितातून कुटुंब , मध्यवर्ती जीवन या प्रायोगिक नाटकातून चित्रित होऊ  लागले.याचीही मोडतोड करून, नवीन वाटा शोधल्या गेल्या. नवीन आशयसूत्राच्या बांधणीतून नवीन नाट्यकृतींची निर्मिती झाली. महेश एलकुंचवार, सतीश आळेकर, दत्ता

भगत, प्रेमानंद गज्वी, श्याम मनोहर, जयंत पवार, अजित दळवी, संजय पवार, दादाकांत धनविजय इत्यादी नाटककारांची नाटके आलीत."अलिकडच्या काळात इतिहास आणि वैचारिक संघर्ष यांना नाट्यरूप देणाऱ्या टिळक-आगरकर , गांधी विरूद्ध गांधी, अशा सगळ्या संहिता ऐतिहासिक पुरूषांची लोकमानसातील प्रतिमा कौशल्याने वापरून प्रेक्षकांचें डोळे पणावतील अशी वेषांतर केलेली कौटुंबिक नाटकेच सादर झालीत"[६] राजकीय आणि सामाजिक संघर्षाचं चित्र दाखविण्यात आलं. त्यानतंर "घाशीराम कोतवालच्या सादरीकरणामुळे मराठी रंगभूमीवर एक नवीन पर्व सुरू झाले."[७] याच काळात मराठी रंगभूमीच्या मर्यादेला मुक्त करणारा एक अविष्कार घडला.या मुक्ततेतून बरेच बदलही झालेत. हे बदल येथे लक्षात घेणे गरजेचे आहे.

साठोत्तरी नाटककारांच्या नाटकांचा विचार केला असता असे दिसून येते की, नाटकांची संहिता दोन अंकी झाली.या नाटकांच्या संहितेतून पारंपरिक , पौराणिक संविधानाची मोडतोड झाली. भाषेतला बदल, व्यक्तिरेखेतला बदल, स्वभावदर्शनातला बदल हा प्रामुख्याने जाणवू लागला. " ह्या पिढीतील नाटकाच्या रचनेत काही घटक एकत्रितपणे वापरून सिद्ध करण्याचा प्रयत्न दिसतो. म्हणूनच कदाचित महेश एलकुंचवारासारखा लेखक प्रारंभीच्या काळात रूपवादी असूनही नंतर वाडा चिरेबंदी सारखे नाटक लिहू शकला.बांधेसूद रचना साठनंतरच्या नाटकात तीव्रतेने जाणवते"[८] असे बदल झालेले दिसून येतात.या नाटकांचा विचार करता असे लक्षात येते की,पौराणिक नाटकांपासून ते कुटुंबकेंद्री नाटक, मध्यमबर्गीय जीवन आणि त्यानंतर रचनातंत्रात प्रामुख्याने बदल होवून, त्याची मोडतोड होवून,नाटकातील व्यक्तिरेखांमध्येही बदल झाला. सांदरीकरणाच्या आणि एकूणच संहिताच्या तंत्रात बांधेसूद रचनातंत्राचा वापर सुरू झाला.

१.' कोण म्हणतं टक्का दिला?' संहिताविचार :

संजय पवार यांनी ' कोण म्हणतं टक्का दिला?' या नाटकातून पौराणिक कथा घेवून, मराठी रंगभूमीवर पौराणिक पात्रांसह नाटक सादर करण्यात आले. परंतु कथानकाला एका वेगळ्य वळणावर घेवून जाण्यासाठी विसाव्या शतकातल्या अखेरच्या दशकात म्हणजे एकविसव्या शतकाच्या आरंभीचा काळच म्हटला तरी फारसा फरक पडणार नाही. हा पौराणिक काळ अधोरेखित करून , पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशाच्या समाप्तीपर्यंत दाखविण्यात आला आणि दुसऱ्या प्रवेशापासून संहितेत बदल करण्यात आला .पौराणिक कथानकाची मोडतोड करून, वर्तमानाशी समन्वय घालून, कथानकातील पात्रांची नावे बदलवून जे पौराणिक कथेत घडतं, त्याउलट बदल करून, देव आणि दानवांच्या जन्माचं शापित कडं भेदून, जातीयता, विषमता याला छेद देवून, दलित ही सुद्धा माणसचं असतात.सवर्ण आणि दलित यातील जातीयतेला तडा देवून, समता या तत्त्वावर माणूस जन्माला घालण्याचा एक यशस्वी प्रयत्न नाटककार संजय पवार यांनी केला आहे.

देव आणि दानव याचं युद्ध, दानवांचा गुरू शुक्राचार्यांना आत्मसात झालेल्या संजीवनी विद्येमुळे देव चिंताक्रांत झालेले आहेत. दानव मात्र अमर आहेत. शुक्राचार्यांच्या मयसभेत मद्याच सेवन करीत बसले आहेत.पौराणिक वातावरण निर्मिती झाली असता, देवयानी कचाला शाप देते.देवयानीचा हा संवादच या नाटकाचा धागा आहे. हा धागा पकडूनच नाटकाच्या निर्णायकतेकडे जाता येतं. देवयानी कचाला म्हणते-

" राक्षसांच्या भावनांशी खेळणारा तू विसाव्या शतकाच्या अखेरीस ,
भूतलावर मागासवर्गात जन्म घेशील आणि कायद्याने तुला सवर्णात वाढावं लागेल,
आणि तेव्हा तुला संजीवनीचा मोह धरल्याचा पश्चाताप , होईल! "

देवयानी कचाला शाप देते. नाटककाराने हा शाप नायिकेच्या संवादातून व्यक्त करताना एकूणच संहिता बदलाचे संकेत दिले. या बदलानुसार संहिता बदलत गेली.ही नायिका देवयानीच बदलेलं रूप असून, सुकन्या म्हणून तिच्या नावातला बदल हा आजच्या युगाला साजेशा आहे. ही नायिका बिनधास्त असून, परिवर्तनवादी विचारांची आहे. माणसा- माणसांमध्ये भेदभाव करणारी नसून, माणसाचं माणूसपण जोपासणारी अशी ही व्यक्तिरेखा या संहितेचा केंद्रबिंदू आहे. आधुनिक दर्पणात दिसणारी ही संहिता कालबाह्यतेचा आरोप धुडकावून, या शतकातील जातियेतेला वाचा फोडते. आणि ही सामाजिक विचारधारा या काळाची गरज आहे. संहिता बदलाच्या बाबतीत नाटककार यशस्वी झालेला आहे.

देवयानी ही शुक्राचार्यांची मुलगी होती.आज ती एका सवर्ण कुटुंबात जन्माला आली. म्हणजे हीन समजल्या जाणाऱ्या दानवांच्या कुटुंबातून सवर्णात जन्माला ती आली. ही मोडतोड फक्त एवढ्याचसाठी की, होणाऱ्या वेदना सवर्णांही कळाव्यात. म्हणून देवयानीच्या शापातून कच हा कचऱ्या या नावाने मागासवर्गीयांमध्ये जन्माला येतो.या येण्याला संजय पवारांनी एक सूत्र जोडलेलं आहे. भारत सरकारच्या घटनात्मक तरतुदीनुसार जीवन जगण्याबद्दलची अदलाबदल या तरतुदीनुसार अपेक्षित आहे. देवाचा पोरगा कच आता दलित म्हणून देवयानीच्या म्हणजेच सुकन्या हिच्या सुखवस्तू घरात तो राहणार आहे. घरातून आई विमलबाईचा विरोध होत असला तरी घटनात्मक तरतुदीनुसार दलिताला घरात ठेवून घेणे बेधनकारक आहे. त्यातून ह्या ब्राम्हण कुटुंबाची सुटका नाही. ती घटनात्मक तरतुद अशी आहे-

" नवीन घटनासत्मक तरतुदीनुसार पुढील महिन्यापासून केंद्र सरकारने
देशातील सर्व प्रकारच्या सर्व ठिकाणच्या राखीव जागा
खास अध्यादेशानुसार रद्द ठरविलेल्या आहेत. "

" उच्चवर्णीय एक मागासवर्गीय स्त्री अथवा पुरूष
सामाजिक समतेचा भाग म्हणून कायद्याने ठेवावा लागेल "

" मागासवर्गीय आपल्या कुटुंबात घेतल्याशिवाय व मागासवर्गीयाने
अशा कुटुंबात गेल्याशिवाय त्यांना, त्या कुटुंबाना
रेशनकार्ड, गॅस, कुठलीही लायसेन्स,
पासपोर्ट इ. बाबी देण्यात येणार नाही. " ह्या आहेत घटनात्मक तरतुदी.

भारत सरकारचा असा दावा आहे की, भारतीय समाजातील जातीयता, विषमता , भेदाभेद ही संपलेली असून, एकूणच भरतीय समाज वर्णवर्गविरहित झालेला आहे. अशी केंद्र सरकारची खात्री आहे. याचा प्रत्यय घेण्यासाठी म्हणून ही घटनात्मक तरतुद करण्यात आली आहे. दलित आणि सवर्ण यांच्यात समानता निर्माण व्हावी . या उद्देशापोटी सरकारने हा अध्यादेश काढला आहे. या अध्यादेशापासून सवर्ण दूर पळू पाहत आहे. काही जोशी ब्राम्हण स्वतःला कुडमुडे जोशी म्हणून सांगण्याच्याही बेतात आहेत. आपण भटके आहोत असं सांगण्याचा प्रयत्न होतो आहे. असं का तर एक दलित आपल्या कुटुंबात राहण्याकरिता येणार आहे. एवढ्यासाठी ...! सतत दलितांच जातीच्या नावाखाली शोषण करायचं. त्याला गाकुसाबाहेर फेकायचं . ही प्रवृत्ती बदललेली नाही. भारतीय समाज आजपर्यंतसुद्धा वर्णवर्ग विरहीत समाज झालेला नाही. परंतु अशा बदलांसाठी समस्त भारतीय समाजाने तयार असलं पाहिजे.एकसंध समाज निर्माण करून, समता नांदली तरच आजचा भारत देश उद्याचा प्रबुद्ध भारत होऊ शकतो.

सुकन्या एका दलित व्यक्तीची निवड करते. दलित घरात येणार या नुस्त्या विचारानं विमलबाई दचकते. त्यावर सुकन्या म्हणते-

"अग, दलित असला,
तरी तो माणूसच आणतोय आपण घरात,
जनावर नव्हे! "

जातीयतेची झापळं बांधून, चालणारी सवर्ण आपण कसे वरिष्ठ आहोत या भ्रमातच जगत असतात. दलित सुद्धा माणसं असतात , हे सुद्धा ते विसरून गेलेले असतात.या अशा वागण्यातूनच वंचित, पीडित, दलित, आणि शोषित यांच्या जगण्याला मूल्यहीन केलं. गावकुसाबाहेरं जीवन त्यांच्या पदराला गाठ मारून बांधलं.

कमलाकर हा सुधारणावादी विचारांचा आहे. बाप म्हणून कमलाकर व सुकन्या या दोघांच्या विचारात एक समान धागा आहे. विमल मात्र सनातनी असून, जातीयतेचा टेंभा मिरवणारी आहे . कमलाकर म्हणतो-

" कमॉन विमल, कुठल्या शतकात वावरतेस?
सरतेशेवटी आपण जातिधिष्ठितच विचार करत असतो.
आणि वर आपणच विचारतो कुठेय जातीयता? "

सुकन्या म्हणते-

" तुझ्या भाषेत सांगायचं मम्मी, तर हे कोण म्हणतं टक्का दिला सारखंच आहे. "

जात मानणारेच सगळेच आहेत . परंतु आम्ही जात मांनतच नाही . असा सुधारकी आव आणायचा . वरवर दिसत नसलं तरी ती आतून खदखदत असते. जीतीयतेचे दलाल सुद्धा असंच भासवतात आणि वेळ आली की, जातीयेतेचं सूत्र बांधून , आपला स्वार्थ साधतात. असा स्वार्थांध झालेला माणूस दुसऱ्या माणसाला माणूस मानणार का? तो त्याच्याकडे जातीच्याच भावनेतून पाहताना दिसतो. मानसिकता बदलविणे ही आज काळाची गरज आहे.

सुकन्याला हवंहवंस वाटणार प्रेम.सुकन्येला ऐकू न येणारा आवाज कचऱ्या आपल्या स्वगतातून ऐकवतो.कचऱ्या म्हणतो-

" तू ऐकते आहेस ना देवयानी?
तुझ्या खेळांचा शापाचा शेवट आलाय.
संजीवनीच्या शोधात मी राक्षसांच्या पोटात शिरलो.
तिथून तू मला इथल्या राक्षसांच्या पोटात ढकललंस.
आणि इथल्या देवांच्या हातात दिलास हा माझा राक्षसी देह
देव- दानव जन्माचं शापित कडं भेदून मी आता,
जन्माला घालणार आहे माणूस.
ज्याला फक्त माणूस माहीत असेल.
जो देवाच्या नावावर राक्षस होणार नाही,
राक्षसांचा देव होऊन मिरवणार नाही.
हे माणूसपण खूप छान आहे देवयानी "

देवयानी व शुक्राचार्यांचे संवाद-

" बाबा, तो पहा आपला कच !
पण तो संचित दिसत नाहीए
की संजीवनीच्या शोधात हिंडताना दिसत नाहीए.

म्हणजे माझी शापाची पॉवर..."

शुक्राचार्य म्हणतो-

" तुझी पॉवर तोच आहे पोरी ;
पण त्याची वाढलीय.
अग त्याला जगण्याचा अर्थ कळल्यावर ,
त्याला मरणाची भीती वाटेलच कशाला."

देवयानीच्या शापामुळे कच दलित म्हणून जन्माला येतो. आणि त्याला जातीयतेचे चटकेही सहन करावी लागतात. माणसाची दुःख त्याला कळतात. त्याला माणूस म्हणूनच जगावं असं वाटतं.आजच्या संदर्भात हा बदल नाटककाराला अपेक्षित आहे. रंगभूमीवरील नाटककाराने केलेला बदल यशस्वी तर झालाच, परंतु हा बदल एक मनामध्ये परिवर्तन निर्माण करणारा आहे. जातीची वेदना सवर्णांनाही कळावी या हेतूने केलेला हा बदल रंगभूमीवरला नवीन वळण देणारा निश्चितच ठरेल. नाटककार म्हणून संजय पवारांकडे ही दृष्टी आहे. याची पावती म्हणजे 'कोण म्हणतं टक्का दिला? ' हे नाटक होय.

**संदर्भ सूची**:

कोण म्हणतं टक्का दिला?:संजय पवार,
प्रकाश रानडे,नीलकंठ प्रकाशन,शिव टिळक रोड, पुणे-३०, आवृत्ती तिसरी२००९
राम गणेश गडकऱ्यांची स्त्रीसृष्टीः डॉ. सुरेश वर्धे , पृ.क्र.३८
देवयानी प्रकाशन, एकविरा को ऑप. हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.सी/८०,
फ्लॅट नं. ३०४, सेक्टर -२०, ऐरोली, नवी मुंबई-४०००७०८
उपरोक्तःपृ.क्र. ३९
किंबहुनाः रवींद्र किंबहुने पृ.क्र. ६
प्रकाश विश्वासराव, लोकवाड.मय गृह,भूपेश गुप्ता भवन, ८५,सयानी रोड, प्रभादेवी मुंबई-२५
उपरोक्तःपृ.क्र.६
उपरोक्तःपृ.क्र.६
उपरोक्तःपृ.क्र.८
उपरोक्तःपृ.क्र.९
उपरोक्तःपृ.क्र.११